आंतरजिल्हा बदलीने कार्यमुक्त करणेबाबत.

श्रीम. पवार विनीयता प्रमोद, ग्रामपंचायत अधिकारी,

पंचायत समिती कर्जत

जिल्हा परिषद अहिल्यानगर

सामान्य प्रशासन विभाग-२

जिल्हा परिषद आदेश क्रमांक.साप्रवि-२/ग्रापं-१/३३६/२०२६

अहिल्यानगर दिनांक :- स्वाक्षरीखाली नमूदप्रमाणे

वाचा:- १. महाराष्ट्र शासन जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश)नियम १९६७ मधील नियम ६ (८)

२. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.जिपब-७११/प्र.क्र.११३/११ आस्था-१४ दि. २९ सप्टेंबर २०११

३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. साप्रवि-२/ग्रापं-१/१६४/२०२६ दि.०७/०४/२०२६.

४.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे यांचेकडील आदेश क्र.जिप/पंचा/आस्था-१/५४६/२०२६ दि.२४/०६/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, श्रीम. पवार विनीयता प्रमोद, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती कर्जत, यांना आंतरजिल्हा बदलीने संदर्भ क्र.०४ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद पुणे येथे अनु. जमाती (महिलो) या प्रवर्गातुन सामावुन घेण्यात येऊन पंचायत समिती इंदापूर, जिल्हा परिषद पुणे येथे पदस्थापना दिलेली असल्याने त्यांना नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी या आदेशाच्या दिनांकास कार्यालयीन वेळेनंतर संदर्भ क्रं.१ मधील तरतुदीनुसार कार्यमुक्त करणेत येत आहे.

गट विकास अधिकारी,पंचायत समिती कर्जत, यांचे पुढील आदेशानुसार श्रीम. पवार विनीयता प्रमोद, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांनी सर्व कार्यभार संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडे पदभार यादीसह सोपवावा.

श्रीम. पवार विनीयता प्रमोद, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती कर्जत. यांची बदली त्यांच्या विनंतीवरुन झालेली असल्याने त्यांना बदली प्रवास भत्ता व वाटचाल कालावधी अनुज्ञेय नाही.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202607230060101 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 23-07-2026 22:20:05
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रति,

१.श्रीम. पवार विनीयता प्रमोद, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती कर्जत, जिल्हा परिषद अहिल्यानगर.
द्वारा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत

२/- श्रीम. पवार विनीयता प्रमोद, ग्रामपंचायत अधिकारी, यांना नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेकामी या आदेशाच्या दिनांकास कार्यमुक्त करणेत आलेले असुन त्यांना पंचायत समिती स्तरावरून

कार्यमुक्त करणेपुर्वी त्यांनी त्यांचेकडील ग्रामपंचायतीचा संपुर्ण पदभार अद्यावत करुन दिला आहे किंवा कसे? या बाबींची पडताळणी करावी तसेच विविध विकास योजनेंतर्गत दिलेले अनुदान, प्रत्यक्षात केलेला खर्च व प्राप्त मुल्यांकनापेक्षा जास्त खर्च केलेला असल्यास वसुलपात्र रक्कम वसुल करावी. तसेच काही आर्थिक गैरव्यवहार नसल्याची खातरजमा करुनच त्यांना कार्यमुक्त करावे. तसेच श्रीम. पवार विनीयता प्रमोद, ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवापुस्तक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचेकडे पाठवावे.

प्रत :- माहीतीसाठी अग्रेषित

१. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद पुणे

२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) जि.प. पुणे / अहिल्यानगर.

३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद पुणे / अहिल्यानगर.

४. गट विकास अधिकारी पंचायत समिती इंदापूर, जिल्हा परिषद पुणे

स्वाक्षरीत/-<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी<br>
जिल्हा परिषद, अहिल्यानगर